Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची ऐतिहासिक भाषणे

ए.एन. फरपट

(इतिहास विभाग प्रमुख)
श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय बोरगांव मंजु
ता.जि. अकोला (महाराष्ट्र)

**सारांश :**

जहाल राष्ट्रवादाचे अध्वर्यू, भारतीय असंतोषाचे जनक,स्वराज्य या संकल्पनेचे उदगाते, प्रचंड जनपाठींबा प्राप्त करणारे अर्थात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक खऱ्या अर्थाने जनमान्य होते. इ.स. 1885 मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना होऊन 10 वर्षांपर्यंत ब्रिटीश सरकार भारतीयांच्या मागण्यांची दखल घेत नाही हे पाहून कॉंग्रेसमधील तरुण वर्ग कमालीचा संतप्त झाला होता राष्ट्रीय कॉंग्रेसमधील या तरुणांचे पुढारीपण त्यावेळी लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी केले. भारतीय कॉंग्रेस सभेच्या प्रत्येक अधिवेशनात पारित झालेल्या ठरावांना गव्हर्नर जनरल कडून केराची टोपली दाखविली जाते. राष्ट्रीय सभेचे नेतृत्व स्विकारणाऱ्या मवाळ किंवा नेमस्त कॉंग्रेस पुढाऱ्यांकडून साचेबध्द किंवा मर्यादित राजकीय कार्यक्रम राबविला जातो.

## प्रस्तावना :

वर्षातुन 3 दिवस राष्ट्रीय महासभेचे अधिवेशन आयोजित करुन विविध विषयांवर काथ्याकुट करण्यापलीकडे राष्ट्रीय सभेची प्रगती होत नाही. या सर्व परिस्थितीमुळे तरुणांमधील असंतोष वाढत जाऊन कॉंग्रेसला जोपर्यंत सर्वसामान्य जनतेचा पाठींबा मिळत नाही किंवा ती जनचळवळ होत नाही तो पर्यंत सरकार कॉंग्रेसची दखल घेणार नाही. यासाठी लोकसंग्रह , लोकसंघटन व लोकजागृती या मार्गाचा अवलंब केला पाहिजे. या वैचारीक मानसिकतेतून कॉंग्रेस अंतर्गत नवीन विचारप्रवाह उदयाला आला. यालाच जहाल राष्ट्रवाद असे म्हटल्या जाते. या वैचारीक मानसिकतेच्या पुढाऱ्यांना जहाल राष्ट्रवादी कॉंग्रेस पुढारी या नावाने ओळखल्या जाते. या जहाल राष्ट्रवादाचे अध्वर्यू महाराष्ट्राचे खातनाम जनमान्य नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे होते.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी जनजागृतीसाठी इ.स. 1893 पासून गणपती उत्सव सुरु केला. इ.स. 1895 पासून टिळकांनी महाराश्ट्रात शिवजयंती उत्सवाचा पाया घातला. लोकमान्य बाळगंगाधर टिळकांनी कॉंग्रेसच्या कार्यपध्दतीवर व मवाळांच्या कार्यपध्दतीवर टिका करीत ब्रिटीश सरकारच्या अत्याचारी व शोषक धोरणाची लक्तरे वेशीवर टांगले. टिळकांची महाराष्ट्रभर शिवजयंती निमित्याने व्याख्याने होऊ लागली. वऱ्हाड प्रांतात लोकमान्य टिळकांचा चाहता वर्ग मोठया संख्येने असल्यामुळे शिवजयंती निमित्याने टिळकांची वऱ्हाड प्रांतात नित्य व्याख्याने होऊ लागली.

अकोला जिल्हयात टिळकांचा अनुयायी वर्ग मोठया प्रमाणात होता. त्यामध्ये श्री परशराम चिंतामण ऊर्फ मामासाहेब जोगळेकर, श्री काशिनाथ विठ्ठल ऊर्फ बापुसाहेब सहस्त्रबुध्दे, श्री नारायण खंडेराव फडके श्री व्यंकटराव देसाई, श्री दत्तोपंत भागवत , श्री सदाशिव भागवत या समस्त मंडळीने टिळकांच्या विचारसरणीचा जिल्हाभर प्रचार केला होता.

अकोला येथे शिवजयंती निमित्ताने व्याख्यानमालेचे आयोजन सातत्याने होत असे. टिळकांची राजकीय मते जहाल स्वरुपाची होती. इ.स. 1908 च्या मे महिन्यात पहिल्या आठवडयात शिवजयंती निमित्याने टिळकांचा वऱ्हाड दौरा आयोजित करण्यात आला होता. दिनांक 2 मे 1908 रोजी टिळक धुळयावरुन अकोला येथे पोहोचणार होते. लोकमान्य टिळकांना पाहण्यासाठी व त्यांचे दर्शन घेवून धन्य होण्यासाठी अकोला स्टेशन परिसरात टिळकांच्या चाहत्यांनी व त्याचे दर्शन घेवुन धन्य होण्यासाठी अकोला स्टेशन परिसरात टिळकांच्या चाहत्यांनी प्रचंड गर्दी केली होती. काळेसावळे, साधारण ठेंगणे, वयाने पन्नाशी उलडून गेलेले लोकमान्य बाळगंगाधर टिळक अकोला येथे पोहचतात स्टेशनवर त्यांच्या जयजयकाराने नभोमंडळ दणाणून गेले होते. लोकमान्य टिळक साडेसहाच्या गाडीने अकोला स्टेशनवर उतरले. टिळकांची अकोला स्टेशनवरुन श्री व्यंकटराव देसाई यांच्या निवासस्थानापर्यंत गाडीतुन मिरवणुक काढण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फी टिळकांना पाहण्यासाठी अलोट गर्दी पसरली होती. टिळकांचा रथ ओढण्यासाठी तरुणामध्ये प्रचंड अहमहमिका दिसत होती. जनसागर विलक्षण होता. लोकांच्या जयजयकारांच्या घोषणा लक्षणिय होत्या. अकोला स्टेशन परिसरात व रस्त्यावर उसळलेला जनसागर पाहून तत्कालीन वऱ्हाड समाचार या अकोला येथुन प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक वृत्तपत्राच्या संपादकांनी "ज्यांच्या नेत्रांनी हा प्रसंग पाहिला त्यांच्या नेत्राचे साफल्य झाले " अशी प्रतिक्रिया दिनांक 4 मे 1908 च्या वऱ्हाड समाचार च्या अंकात व्यक्त केला आहे.

दिनांक 2,3 व 4 मे 1908 रोजी अकोला येथे 3 दिवस शिवजयंती निमित्य टिळकांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. टिळकांच्या या व्याख्यानमालेला पुणे येथुन केसरीमध्ये, अकोला येथुन साप्ताहीक वऱ्हाड समाचार मध्ये व नागपुर येथुन हिंदकेसरी या वर्तमानपत्रातुन तर अच्युतराव कोल्हटकरांच्या संपादकत्वाखाली नागपुर येथुन प्रकाशित होणाऱ्या देशसेवक या समस्त वर्तमानपत्रातुन चांगलीच प्रसिध्दी मिळाली होती. लोकमान्य टिळकांना दिनांक 13/07/1908 रोजी पुणे येथे त्यांच्या 53 व्या वाढदिवशी अटक होऊन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला व त्यांना 6 वर्ष सश्रम कारावासाची (काळयापाण्याची) शिक्षा ठोठावण्यात आली. टिळकांची रवानगी

ब्रम्हदेशातील मंडाळे येथे करण्यात आली . अकोला येथील व्याख्यानांच्या नंतर दिड–दोन महिन्यांच्या काळात हा समस्त घटनाक्रम घडल्यामुळे टिळकांच्या अकोला येथील व्याख्यानांना विशेष प्राप्त होते.

***जहाल –***

मवाळांची ध्येयधोरणे व स्वराज्यप्राप्तीची साधने, त्यांच्यातील परस्पर विसंगती, लोकमान्य टिळकांची निर्भयता व त्यागीवृत्ती तसेच बलीदानाची मानसिकता, शिवजयंती उत्सवाचे निमित्याने झालेली व होणारी बहुजन समाजातील स्वाभिमानाचीवृध्दी, त्यांच्यातील पुरुषार्थ दर्शन या समस्त बाबींवर प्रभाव पाडणारे टिळकांची भाषणे ऐतिहासिक ठरली असुन ती ऐतिहासिक भाषणे हदयस्पर्शी आहेत.

दिनांक 2 मे 1908 रोजी अकोला येथे शिवजयंती निमित्त टिळकांचे पहिले व्याख्यान झाले. या व्याख्यानात टिळकांनी शिवाजी महाराजांचे चरित्र लोकांना उलगडून सांगितले. "छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील लोकांना पशुवृत्तीतून काढून मनुष्यवृत्तीत आणले, हेच शिवचरित्राचे रहस्य आहे. जुलमी सुलतानाची दास्यता झुगारुन देत जनतेला स्वातंत्र्याचा किल्ला दाखविणारे श्री छत्रपती शिवाजी, परिस्थितीच्या साम्राज्याखाली दडपुन जाण्यापेक्षा परिस्थितीवर मात करा असा सल्ला जनतेला देत होते. परिस्थितीवर साम्राज्य करण्याची गुरुकिल्ली लोकांना देणारे छत्रपती शिवाजी सर्वसामान्यांचे नेते होते. रामाला ज्याप्रमाणे माकडांच्या सहाय्याने समुद्रापलीकडे राहणाऱ्या रावणाचा बिमोड करावा लागला. त्याप्रमाणेच शिवाजी महाराजांनी मावळ खोऱ्यातील शूर,काटक, वनपनविहारी , साध्याभोळया मावळयांच्या मदतीने आपला स्वराज्य संस्थापनेचा संकल्प सिध्दिस नेला. परिस्थितीला घाबरु नका हाच शिवाजी महाराजांचा संदेश आहे. स्वराज्य हे आपल्या हातचे आहे हाच बोध शिवचरीत्राचे रहस्य आहे. किंबहुना शिवचरित्राचा तो प्राण किंवा गाभा आहे. ब्रिटीश साम्राज्य जर भारतीयांचे हाताने चालते तर या साम्राज्यात राहुन आपल्या नैसर्गिक स्वभावाची खूण जे स्वराज्य किंवा स्वांतत्र्य आहे ते आपल्यापासुन किती दूर असावे" . लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे हे व्याख्यान तत्कालीन राजकीय परिस्थितीत राजद्रोहाच्या कचाटयात न अडकता जनतेला स्वराज्यासाठी मानसिक दृष्टया तयार करणारे होते.

लोकमान्य बाळगंगाधर टिळकांचे व्याख्यान निःशब्द शांतता राखत लोक जीवाचा कान करुन ऐकत होते. "शिवाजीच्या चरित्राचे रहस्य म्हणजे त्यांनी जागृत केलेला राष्ट्रधर्म होय. स्वराज्य या शब्दाची उत्पत्ती ही शिवाजी महाराजांच्या काळापासूनच झाली आहे. स्वराज्य हे मनुष्याचे अंतिम ध्येय आहे. मी म्हणतो तो आमचा नैसर्गिक हक्क आहे. आमचा निसर्गदत्त हक्क जेव्हा आम्ही मागतो तेव्हा मोर्ले साहेब म्हणतात आम्ही चांदोबा मागतो. ज्या मनाच्या कृतीला मर्यादा घालण्याचे सामर्थ्य कोणाजवळही नाही त्याबाबत मोर्ले साहेबांनी असे व्यक्तत्व का करावे ?

मनुष्याला ज्याप्रमाणे नाक – कान असतात त्याप्रमाणे स्वातंत्र्य सुध्दा असते. ज्याला हे नैसर्गिक वाटत नाही तो पशु आहे असेच म्हणावे लागेल. छत्रपति शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील जनतेला याच पशुवृत्तीतून काढून मणुष्यवृत्ती आणले होते. पशु आणि मनुश्य यांच्यातील फरक त्यांच्या अंतिमामध्ये आहे. बैलाची प्रगती म्हणजे त्याला नांगराला जुंपणे, मनुष्याचे स्थित्यंतर अशाच प्रकारे होवु देणे म्हणजे त्याची स्वर्गाची वाट खुंटविणे होय कारण मनुष्याचे अंतिम पुर्ण स्वराज्य आहे. "

टिळकांनी हिंदु मुस्लीम ऐक्यावर बोलतांना "काशिस जावे किंवा मक्केस जावे असे आपण हिंदु व मुसलमानांना सांगतो. काशी फार लांब आहे म्हणुन एखाद्या गोदावरी सारख्या नदीत स्नान करुन पवित्र व्हा हे सांगणे कोणाला रुचले ? काशी क्षेत्र व मक्केची मशीद ही पवित्र स्वातंत्र्य देवीची मंदीरे होत. त्याकडे तोंड करुन आपला राजकीय मार्ग अनुसरला पाहिजे. ब्रिटीश राजाकडे नजर ठेवून मार्ग आक्रमा असे सांगितले तर कोणी ऐकणार नाही ! धर्माचे बाबतीत घ्या की, राजकीय बाबतीत घ्या. शेवटची अंतिम गोश्ट ही महत्वाची असते. आम्ही स्वतंत्र रहावे ही परमेश्वराची ईच्छा आहे. संकटांना भिक न घालणारा मनुष्यच खऱ्या अर्थाने राष्ट्रधर्माचे व मनुश्य धर्माचे पालन करीत असतो. मनुश्य जसा विचार करतो तसा तो होईल. कारण स्वराज्य व स्वतंत्रता या सारख्या गोष्टी त्याच्यातील ईश्वरीय अंकुर आहेत. स्वराज्याच्या अपेक्षा करणे नैसर्गिक आहेत. स्वराज्य हे आपल्या हातच आहे हाच शिवचरित्रातुन मिळणारा बोध आहे."

राष्ट्रीय क्रॉंगेसमधील मवाळ किंवा नेमस्त पुढाऱ्यांबद्दल बोलतांना "आपल्यापैकी काही मंडळी परिस्थितीला भिवुन दुसऱ्यांनाही भेदरुन टाकतात. शिवाजीच्या मार्गात खुद्द त्यांचे वडील शहाजी आड आले होते. शहाजीची निती तीच आमच्या मवाळांची आहे. त्याच्यामध्ये आजन्म खिळलेली खोड आता जावयाची नाही. ती त्यांच्या बरोबरच लय पावेल. अशा भितीला थारा न देण्यासाठीच शिवाजीचा अवतार झाला होता. प्रस्तृत मवाळ व जहालांमध्ये जो मोठा वाद आहे तो मुख्यत्वे तत्व संबंधाने आहे. राष्ट्रधर्म प्रतिपादन करणारी जहाल मंडळी मवाळ मंडळी बरोबर एकदिल होऊ शकत नाही. कारण स्वराज्य किंवा स्वातंत्र्य हा मनृष्याचा स्वभावसिध्द हक्क आहे आणि या हक्काच्या अंतिमामध्ये आणेवारी बिलकुल उपयोगाची नाही. स्वराज्यापेक्षा दुसरे उदीष्ट माणसाचे नसावे. जहालांच्या अंतिमापेक्षा मवाळांचे अंतिम चार आणे कमी आहे. पण हा चार आण्याचा कमीपणा फार घातक असुन मनुष्याचा मनुष्यपणाच काढुन टाकणारा आहे. जेव्हा जेव्हा मनुष्यधर्माची संस्थापना परिस्थितीला अशी पालटुन करावयाची असते तेव्हा अवतारी पुरुष आपण होवुनच मनुष्य देहामध्ये निर्माण होतात. अवतार कार्यायी सिध्दता करुन ठेवण्याचे कार्य आपले आहे. छत्रपति शिवाजी महाराजांसारखे अवतारी पुरुष कोणत्याही परिस्थितीला न जुमानता स्वांतत्र्यतेची दैवी संपदा आपलीशी करतात. परिस्थितीवर मात करा तोच मनुष्याचा खरा धर्म आहे ."

दिनांक 3 मे 1908 रोजी टिळकांचे अकोला येथे दुसरे व्याख्यान झाले. या व्याख्यानात टिळकांनी ब्रिटीशांचे अर्थकारण, त्यांनी स्वार्थसिध्दीसाठी आमचे धंदे कसे बुडविले, राजद्रोह जर गुन्हा असेल तर भारताला गुलाम ठेवण्याचा समाजद्रोह पाप नव्हे काय?ब्रिटीशांना हे पापक्षालन करणे भाग पाडा! आपला उध्दार आपण करु ! आमच्या सहकार्याशिवाय इंग्रजांचे राज्य चालणार नाही या सारख्या अनेक विषयांवर मार्मिक व उपरोधिक मार्गदर्शन केले.

स्वदेशीचे महत्व जनतेला पटवून सांगतांना अतिशय भावनिक शब्दात हिंदुस्थानचे वर्तमान दारिद्रय त्यांनी जनतेसमोर मांडले होते. हिंदु–मुस्लिम ऐक्यावर भर देत टिळक बोलले होते "सर्वाच्या डोक्यावर एकच साम्राज्य फिरत आहे. हिंदु कोष्टी व मुसलमान मोमीन दोघांना मॅन्चेस्टरने साफ नाहीसे केले आहे. आमच्यापैकी कोणी सरकारची खोटी तरफदारी करीत आहेत. परंतु मी म्हणतो इंग्रजांची अक्कल त्यांच्या स्वार्थाकरीता , आमची अक्कल आमच्या स्वार्थाकरीता. शिवजयंती उत्सव, परस्पर वैर माजविण्यासाठी नाही. सध्या गुणाची अपेक्षा आहे. जातीची नाही. शिवाजी जरी मुसलमानात जन्माला आला तरी आम्हाला वाईट वाटण्याचे कारण नाही !"लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी आपल्या व्याख्यानात राष्ट्रीय शिक्षणाचे महत्व प्रतिपादन करुन हिंदुस्थानला खऱ्या अर्थाने आपल्या प्राचीन गौरवशाली इतिहासाकडे पाहण्याची गरज आहे असे म्हणताच उपस्थित श्रोत्यांच्या प्रचंड टाळया व प्रसन्न मुद्रा वातावरणात वेगळा हुंकार भरीत होत्या. लोकमान्य टिळकांनी दुसरे व्याख्यान दिल्यानंतर अकोला परिसरात टिळकांच्या व्याख्यानाची प्रचंड चर्चा सुरु झाली. त्याचे परिणाम दुसऱ्याच दिवशी दिसले.

4 मे 1908 रोजी टिळकांच्या तिसऱ्या व्याख्यानाला शेंगांवचे सत्पुरुष संत श्री गजानन महाराज व्यासपीठावर उपस्थित झाले होते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व विदर्भाची पंढरी म्हणून प्रसिध्द असलेल्या शेगांवचे अवलीया संत गजानन महाराज यांना एकत्र पाहण्यासाठी अफाट जनसागर उलटला होता. व्यासपीठावर सन्मानपुर्वक गजाजन महाराजांना बसविल्यानंतर टिळक बोलू लागले. "आज जमलेला समाज व प्रसंग फार अपूर्व आहे. शिवाजी उत्सवाचा हा तिसरा दिवस? अशावेळी आपल्या प्रांतातील प्रसिध्द साधुपुरुष श्री गजानन महाराज यांचे आगमन होऊन सभेवर त्यांनी अशाप्रकारे अनुग्रह करावा ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. असे प्रसंग शिवजयंती उत्सवात आजपर्यंत आले नव्हते. अकोलेकरांनी मला येथे आणून अशा सत्पुरुषाचे भेटीचे श्रेय दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. " स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षणाचे महत्व स्पष्ट

करतांना गुलाम करुन ठेवणे हाही प्रजाद्रोहाचा गुन्हा आहे. स्वराज्याची ओळख सरकारी शिक्षणाने होणार नाही. इंग्रजांचे ताब्याखाली पशूप्रमाणे काम करु शकाल असे शिक्षण मिळत असते. त्याने फार तर किताब व नोकऱ्या मिळतील. खऱ्या राष्ट्रधर्माची शिकवण सरकारी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना होवू शकत नाही. आपल्या मानवी व जन्मसिध्द हक्काची जाणीव करुन देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था व शाळा काढल्याखेरीज पर्याय नाही. मनुश्याची कार्यसिध्दी त्याच्या कर्तव्यावर अवलंबुन असते. स्वराज्य व स्वातंत्र्य हा मनुष्याचा नैसर्गिक अधिकार आहे. टिळकांची ही गर्जना अकोला येथे झाली होती. आधुनिक भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहील्या गेलेले टिळकांचे घोशवाक्य "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळविलच!" या घोषवाक्याची मुहुर्तमेढ अकोल्याच्या भूमित टिळकांच्या या व्याख्यातुनच रोवल्या गेली. पुढे स्वातंत्र्य हा मनुष्याचा नैसर्गिक हक्क आहे या घोषवाक्याचे स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे अशाप्रकारे रुपांतर झाले. टिळकांचे हे ऐतिहासिक घोषणा व्यक्तत्व अकोल्याच्या भूमित प्रथम झाले आहे ही बाब अकोलेकर जनता कदापिही विसरु शकणार नाही. "

***संदर्भसाधने :–***

1) साप्ताहिक : वऱ्हाड समाचार, (वृत्तपत्र), अकोला दिनांक 4 मे 1908
2) उदासी,बि.ना., : " स्वातत्र्य संग्रामातील वऱ्हाडचे योगदान " लेखमाला दै. मातृभूमि,अकोला,लेखांक : 18वा दिनाक 22 डिसेंबर 1985 पृ.क्र.2.
3) ओक भाई चंदू :– " स्मृतींच्या मशाली " ओंकारप्रसाद मिश्र,चिटणीस, स्मृतींच्या मशाली प्रकाशन समिती,अकोला वर्श : 1986 पृ.क्र.39.
4) श्रवैप Dr. P.L.(Editor) :Political Ideas & Leadership in Vidarbha, Published by : Sci & Public . Dept. Nagpur Uni., Nagpur-1980,P.N.286
5) वक्कानी, डॉ. नि.आ.,: आधुनिक विदर्भ का इतिहास, नागपुर –2, पृ.क्र.59.
6) काळे य.ह.(संपादक): " अकोला नगरपालिका शताब्दी स्मृतीग्रंथ, प्रकाशनः विनयकुमार पाराशर, वर्षः1970 पृ.क्र.210.
7) बियाणी कमलकिशोर : क्या आप जानते है?प्रथम संस्करण,अकोला, 1955 पृ.क्र.36.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net